महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका/न.क्र.५६९/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक :

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३१ दि. २१ / १० / २०२१

**विषय:- राज्य शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१.०७.२०२१ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता व घरभाडे भत्ता मंजुर करणे बाबत.**

**संदर्भ:-** १. शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र. घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५ दि. ०५.०२.२०१९
२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०० दि. १४.०१.२०२०.
३. शासन निर्णय क्र. मभवा-२०१९/प्र.क्र.३०/सेवा-९ दि. ०७.१०.२०२१

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितमधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत दराने महागाई भत्ता व घरभाडे भत्ता मंजूर केला जातो.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचा शासन निर्णय क्र. मभवा-२०१९/प्र.क्र.३०/सेवा-९ दि. ०७.१०.२०२१ अन्वये राज्य शासकीय व महागाई भत्ता अनुज्ञेय असणारे इतर सर्व पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जुलै, २०२१ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर **१७%** वरून **२८%** करण्यात यावा असे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

३. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचा शासन निर्णय क्र. घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५ दि. ०५.०२.२०१९ मध्ये आदेशित केलेल्या ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणीच्या आधारे सुधारीत दराने घरभाडे भत्ता दि.०१.०१.२०१९ पासून लागू केला असून, सदर तरतुदी म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रशासकीय परिपत्रक क्र.५९० दि.१८.०९.२०१९ अन्वये अंगिकृत केल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये असेही आदेशीत आहे की, X, Y, Z वर्गीकृत शहरांना ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा २५ टक्क्याची मर्यादा ओलांडेल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना अनुक्रमे २७%, १८% व ९% दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा.

४. आता शासनाच्या धर्तीवर **दिनांक ०१ जुलै, २०२१** पासून, म.रा.वि.वि.कं. मर्यादितमधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्त्याचा दर **१७%** ऐवजी **२८%** असा सुधारीत करण्याकरीता व **X, Y, Z** वर्गीकृत शहरांना अनुक्रमे **२७%, १८% व ९%** या दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यास मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारित महागाई भत्ता व सुधारीत घरभाडे भत्त्याची रक्कम माहे **ऑक्टोबर-२०२१** च्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

Scanned by CamScanner

५. उपरोक्त सुधारीत दराने द्यावयाच्या **दि. ०१ जुलै, २०२१ ते दि. ३० सप्टेंबर, २०२१** या कालावधीतील महागाई भत्याची व घरभाडे भत्त्याची थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(अ.म.भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (निगम व वित्त) / (अंतर्गत लेखापरिक्षण) / (निगम व लेखा) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
७) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

Scanned by CamScanner

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जुलै, २०२१ पासून सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः मभवा-२०१९/प्र. क्र. ३०/सेवा-९
मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ७ ऑक्टोबर, २०२१

वाचा - १. शासन निर्णय क्रमांकः मभवा-१३१९/ प्र. क्र. ३०/ सेवा-९,
दिनांक : ४ जानेवारी, २०२०
२. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग आदेश क्रमांक १/१ /२०२०-इ. II (बी), दिनांक २० जुलै, २०२१

शासन निर्णय -

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जुलै, २०२१ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर १७% वरुन २८% करण्यात यावा. सदर वाढीमध्ये दिनांक १ जानेवारी, २०२०, दिनांक १ जुलै, २०२० आणि दिनांक १ जानेवारी, २०२१ पासूनच्या महागाई भत्ता वाढीचा समावेश आहे. मात्र दिनांक १ जानेवारी, २०२० ते दिनांक ३० जून, २०२१ या कालावधीत महागाई भत्त्याचा दर १७ % इतकाच राहील. सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासून रोखीने देण्यात यावी.

दिनांक १ जुलै, २०२१ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ या ३ महिन्यांच्या कालावधीतील महागाई भत्ता वाढीच्या थकबाकीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११००७१५५०५८५४०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. अ. धोत्रे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
४. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. विरोधी पक्षनेते विधानपरिषद/ विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन , मुंबई
८. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१०. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
१३. सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
१४. मंत्रालयीन सर्व विभाग
१५. मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२१. आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
२२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई/नागपूर/औरंगाबाद

२४. राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
२५. सर्व विभागीय आयुक्त
२६. सर्व जिल्हाधिकारी
२७. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
२८. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
२९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२. सर्व कोषागार अधिकारी
३३. लेखाधिकारी, सर्व वेतन पडताळणी पथके,मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
३४. मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
३५. कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहूरोड/देवळाली/अहमदनगर
३६. कुलसचिव, सर्व कृषि आणि कृषितर विद्यापीठे
३७. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई
३८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती नागपूर
३९. बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
४०. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
४१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४
४२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
४३. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
४४. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट,मुंबई-२१
४५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
४६. वित्त विभागातील सर्व कार्यासने
४७. निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारीत
दराने घरभाडेभत्ता मंजूर करण्याबाबत..........

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

## शासन निर्णय क्रमांकः घभाभ-२०१९ / प्र. क्र. २ /सेवा-५

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: ५ फेब्रुवारी, २०१९

**वाचा -**

१) शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दि.२५ एप्रिल, १९८८
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दि. ११ डिसेंबर, १९९८
३) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग क्र. घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दि. ५ जानेवारी, १९९९
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, घभाभ-१००३/प्र.क्र.४५/सेवा-५, दि.१० नोव्हेंबर, २००३
५) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१००५/प्र.क्र.१३/सेवा-५, दि. १७ जून, २००५
६) शासन निर्णय, वित्त विभाग, संकीर्ण-१००९/प्र.क्र.४०/सेवा-५, दि. १३ मे, २००९
७) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१००९/प्र.क्र.६७/सेवा-५, दि. २४ ऑगस्ट, २००९
८) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/५/२०१४-ई.II(बी), दिनांक २१ जुलै, २०१५ चे ज्ञापन
९) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि. १६ डिसेंबर, २०१६
१०) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/५/२०१७-ई.II(बी), दिनांक ७ जुलै, २०१७ चे ज्ञापन
११) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९

**प्रस्तावना**

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने केंद्रिय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या वेतन मॅट्रीक्स व वेतन स्तर या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९, अन्वये वेतन मॅट्रीक्स व वेतन स्तर लागू केले आहे. तसेच केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना, सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीत उपरोक्त अनुक्रमांक (१०) येथील दिनांक ०७ जुलै, २०१७ च्या आदेशान्वये सुधारीत दराचा घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या घरभाडे भत्याच्या दरामध्ये, उपरोक्त दि.०७.०७.२०१७ च्या ज्ञापनान्वये झालेली सुधारणा विचारात घेऊन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतर पात्र कर्मचाऱ्यांना शहरे व गांवे यांचे सुधारीत पुनर्वर्गीकरण विचारात घेऊन, सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीत सुधारीत दराचा घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी यांना घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी शहरांचे/गावांचे शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १६.१२.२०१६ अन्वये यापूर्वीच पुर्नवर्गीकरण करण्यात आलेले आहे. सदर बदललेले / सुधारीत वर्गीकरण विचारात घेऊन, संबंधित शहरांना / गावांना, त्यांच्यासमोर स्तंभ-४ मध्ये दर्शविल्यानुसार ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणीच्या आधारे सुधारीत दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा.

हे आदेश दिनांक ०१.०१.२०१९ पासून अंमलात येतील.

| अ.क्र. | शहरांचे / गावांचे वर्गीकरण | घरभाडे भत्त्याचे विद्यमान दर (मूळ वेतनाची टक्केवारी) | घरभाडे भत्त्याचे सुधारीत दर (मूळ वेतनाची टक्केवारी) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | X एक्स | ३० टक्के | २४ टक्के |
| २ | Y वाय | २० टक्के | १६ टक्के |
| ३ | Z झेड | १० टक्के | ८ टक्के |

तथापि X, Y व Z वर्गीकृत शहरांना अनुक्रमे किमान रु.५४००, रु.३६०० व रु.१८०० इतका घरभाडे भत्ता अनुज्ञेय राहील. ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा २५ टक्क्याची मर्यादा ओलांडेल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना अनुक्रमे २७%, १८% व ९% दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा. तसेच ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारी महागाई भत्त्याची रक्कम ही ५० टक्क्यापेक्षा अधिक होईल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना, अनुक्रमे ३०%, २०% व १० % अशा वाढीव दराने, घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा.

सुधारीत दराने घरभाडे भत्त्याची परिगणना करण्यासाठी मूळ वेतनामध्ये, “विशेष वेतन” इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल.

२. घरभाडे भत्त्याच्या अनुज्ञेयतेसंबंधीच्या विद्यमान आदेशातील इतर सर्व तरतूदी व अटी जशाच्या तशा लागू राहतील.

३. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या आदेशाच्या परिणामी होणारा घरभाडेभत्त्यावरील वाढीव खर्च हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधिचा खर्च ज्या संबंधित लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत घरभाडेभत्त्यावरील खर्च संबंधित प्रमुख लेखाशिर्षाखाली, ज्या उपलेखाशिर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची टाकण्यात येतो. त्या उपलेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सर्व विभागप्रमुख, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कृषि व कृषितर विद्यापिठांचे कुलसचिव यांनी याबाबत होणारा जादा खर्च सुधारीत अंदाजपत्रक तयार करतांना विचारात घ्यावा.

४. स्थानिक पुरक भत्ता व वाहतूक भत्ता हे दोन्ही भत्ते हे ६ व्या वेतन आयोगाच्या कालावधीत, ज्या दराने अदा करण्यात येत होते, त्याच दराने अदा करण्यात यावेत.

५. हे आदेश दि. ०१.०१.२०१९ पासून अंमलात आले आहेत असे समजण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२०५१४३६४६२००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.02.05 14:38:56 +05'30'

**( भा. ज.गाडेकर )**
उप सचिव, वित्त विभाग

**प्रत,**

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
३. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
८. राज्यपालांचे सचिव,
९. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
१०. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
११. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
१३. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
१४. सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
१५. सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
१६. मंत्रालयीन सर्व विभाग,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
२०. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
२१. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२३. *प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२४. *सहसंचालक, ऑल इंडीया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई,
२५. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
२६. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
२७. नगर विकास विभाग (यूडी-१०), मंत्रालय, मुंबई (२० प्रती),

२८. कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्य्व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
२९. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
३०. संचालक, लेखा व कोषागार, मुंबई,
३१. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
३२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
३३. जिल्हा लेखापरिक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा - अहमदनगर
३४. जिल्हा लेखापरिक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा - रत्नागिरी
३५. जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
३६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३८. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
३९. उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
४०. कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
४१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
४२. *सचिव राज्य माहिती आयोग
४३. संचालक, तांत्रिक शिक्षण, द्वारा तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
४४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
४५. सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
४६. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
४७. आयुक्त, महानगर पालिका, नागपूर
४८. प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह) मुख्य अधिकारी, सर्व नगर पालिका
४९. कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/ देहू रोड/देवळाली/अहमदनगर
५०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
५१. संचालक आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
५२. संचालक समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
५३. संचालक आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
५४. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक
५५. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
५६. अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर
५७. सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
५८. सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
५९. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
६०. कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर,
६१. कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
६२. कुलसचिव, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
६३. कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
६४. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई,

६५. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,
६६. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,
६७. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
६८. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
६९. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
७०. कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,
७१. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
७२. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
७३. अधिक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे
७४. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर, दक्षिण व पश्चिम विभाग)
७५. सर्व कन्याशाळा निरीक्षका
७६. सर्व जिल्ह्याचे वरीष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
७७. शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगर पालिका
७८. संचालक, नगर पालिका प्रशासन, मुंबई
७९. सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
८०. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
८१. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं. , योगक्षेम समोर, वसंतराव गवस चौक, नरीमन पॉईंट, मुंबई २० (५ प्रती)
८२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४ (५ प्रती)
८३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५ प्रती)
८४. इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
८५. नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई २१ (५प्रती)
८६. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
८७. वित्त विभागातील सर्व कार्यासन,
८८. निवडनस्ती, वित्त विभाग/सेवा-५,

- पत्राने